# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. २३ मार्च २०२३

### जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १२४/२०२३ भादवि ३२४,३२३,३२५,५०४,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २१/०३/२०२३ रोजी १०.४५ वा. सेंट्रल आयकॉन अपार्टमेंट पार्किग एरिया मध्ये सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/०३/२०२३ रोजी ००.१२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अस्लम फरीदसाब नरसापुरे,वय-४४ वर्षे,रा- सेट्रल आयकॉन अपार्टमेंट रूम नं ४०४ चौथा मजला शनिवार पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) महेबूब (सोसायटीचा वॉचमन),२)मोहसीन सय्यद पुर्ण नाव पत्ता माहित नाही. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादी हे त्याचा मुलगा जहिर यास कॉलेजला सोडण्यास जात असताना ते पार्किग येथे आले असता त्यांना आरोपी क्र १ हा भेटला असता फिर्यादीने त्यास टेरीसवरील टाकीमध्ये पाणी का सोडत नाहीस असे विचारले असता अरे मी पाणी कुटून सोडणार मला ते सांगायचे नाही असे म्हणून फिर्यादीस शिवीगाळ करू लागला व हाताने मारहाण करू लागला तेवढयात सदर भांडण ऐकून टेलरकाम करणारा यातील आरोपी क्र २ हा तेथे आला व फिर्यादीस त्यास तु वॉचमनशी का वाद घालतोस असे म्हणून फिर्यादीचे अंगावर आला त्यावर फिर्यादीने त्यास तु का आमच्या भांडणात पडतोस असे म्हणाले असता आरोपी क्र २ याने दुकानातून एक जाड काठी घेवून येवून फिर्यादीचे डाव्या हातास मारहाण केली त्यात फिर्यादीचे डाव्या हाताचे मागील हाड फ्रॅक्चर करून जबर दुखापत केली आहे त्यावेळी फिर्यादीचा मुलगा जहिर हा माझ्या पप्पाला मारू नका असे म्हणताच यातील आरोपी क्र २ याने फिर्यादीचे मुलास काठीने त्याच्या दंडावर व कपाळावर जोरात मारल्याने त्यात मुलाच्या कपाळावर खोच पडली आहे.म्हणून. तपासः- पोसई लोंढे- |

### विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १६६/२०२३ भादवि ३२४,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २१/०३/२०२३ रोजी ११.१२ वा. आदित्य हॉटेल अंबर हॉटेलच्या जवळ जुळे सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/०३/२०२३ रोजी १३.२८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | कुणाल सुर्यकांत कसबे,वय-३८ वर्षे,रा- मीरा नगर एसबी हाईट घरनं ३०१,जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | तीन अनोळखी इसम. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि २१/०३/२०२३ रोजी ११.१२ वा च्या सुमारास यातील फिर्यादी हा आदित्य हॉटेल येथे जेवणाची ऑर्डर देवून तेथे असलेल्या खुर्चीवर बसलेले असताना तेथे आलेले अनोळखी इसम हे फिर्यादीस उठ येथून दुसरीकडे बस असे म्हणाल्यावर फिर्यादी त्यांना मी जेवणाची ऑर्डर दिली आहे तेव्हा तुम्ही दुसरीकडे बसा म्हणाल्यावर यातील तीन अनोळखी इसमांनी नाव पत्ता माहित नाही यानी माराहण शिवीगाळ करून त्यातील एका इसमाने जवळच असलेल्या बिअरच्या बाटलीने फिर्यादीचे डोक्यात मारून जखमी केले आहे.म्हणून. तपासः- पोना/१७७०/शेळके- ७२६४९३१८३२ |